CMYK




सायं.दैनिक
बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN




बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २४५ ▪ सोमवार, दि. १२ जानेवारी, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १३ जानेवारी, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-245 ▪ Monday 12 January, 2026 ▪ Postal Date 13 January, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2


# राज्यातील जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुका पुन्हा लांबणीवर; सुप्रीम कोर्टाकडून १५ दिवसांची मुदतवाढ

**मुंबई । किसान न्युज**

**राज्यातील प्रलंबित जिल्हापरिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या निवडणुका पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निवडणुकांच्या घोषणेची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना आता आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्याने इच्छूकांचा हिरमोड झाला. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.**

मात्र, प्रशासकीय अडचणी आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ हवा असल्याने आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मागितली होती. आज सोमवारी या अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाची विनंती मान्य केली आहे. राज्य निवडणूक आयोगाला जिल्हापरिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून, आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ज्या जिल्हापरिषद आणि पंचायत समित्यांमधील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली नाही, त्या निवडणुका तुम्ही पूर्ण करा, असे कोर्टाकडून सांगण्यात आले.

## राज्य निवडणूक आयोगाला दिलासा



### आरक्षणाचा पेच आणि नवीन याचिका

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दा कळीचा ठरला आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्या येथे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असल्याने त्यांच्या निवडणुका घेण्यास तांत्रिक अडचण नाही. २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांच्या निवडणुकांवर प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

### आयोगापुढील पेचः एकत्रित की टप्प्याटप्प्याने?

सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा उडालेला आहे. या निवडणुका संपण्यापूर्वीच जिल्हापरिषदांच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मिळाल्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका काहीशा लांबणीवर पडल्या आहेत. आता राज्य निवडणूक आयोग केवळ आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक घेते की सर्वच जिल्ह्यांचा पेच सुटेपर्यंत थांबते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### तरीही दोन टप्पेच

सुप्रीम कोर्टाने जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली असली तरी १५ फेब्रुवारीच्या आत ५० टक्के आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हापरिषद आणि त्याच जिल्ह्यातील पंचायत समित्यांची निवडणूक होईल, आरक्षण मर्यादा ओलांडली असलेल्या जिल्हापरिषद निवडणुका दुसऱ्या टप्प्यात होईल असे दिसून येत असल्याने वेळ वाढवा तरी दोन टप्प्यांत निवडणुका होणार असे चित्र आहे.


# धनंजय मुंडे लवकरच मंत्रिमंडळात दिसतील!

## राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे सुसंकेत

### यंत्रणेच्या तपास चौकशीत धनंजय मुंडे यांचे नाव नाही किंवा त्यांचा संबंध नाही – प्रफुल्ल पटेल

**मुंबई । किसान न्युज**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे त्यांच्यावर झालेल्या आरोपांच्या नंतर मागील एक वर्षापासून सरकारच्या बाहेर असून, लवकरच ते मंत्रिमंडळात पुनरागम करतील असे सूतोवाच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी केले आहेत. एका प्रसिद्ध राष्ट्रीय वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत प्रफुल्ल पटेल यांनी धनंजय मुंडे यांना सहन कराव्या लागलेल्या मनस्ताप व त्रासाबद्दल देखील वक्तव्य केले आहे. बीड जिल्ह्यात तत्कालीन निर्माण झालेल्या परिस्थिती मध्ये जनभावनेचा विचार करून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला गेला होता. त्या प्रकरणात चौकशी देखील पूर्ण झाली असून यामध्ये कुठेही धनंजय मुंडे यांचे नाव नाही, त्यांच्यावर कुठलाही आरोप नाही, तसेच कुठेही त्यांचा संबंध



आढळून आलेला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील केले जाईल, असे वक्तव्य श्री पटेल यांनी केले आहे. विशेष म्हणजे

» पान २ वर



# माँ साहेबांना मुजरा...



बीड :– राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त अनेक मान्यवरांनी अभिवादन केले.

# पीआय बंटेवाडांचे तपासातील चातुर्य आले कामी

## अंकुश नगर हत्या प्रकरणातील आरोपीच्या चार दिवसांत आवळल्या मुसक्या

**बीड । किसान न्युज**

शहरातील अंकुश नगर भागात दिवसाढवळ्या झालेल्या हर्षद शिंदे हत्या प्रकरणातील आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. चार दिवसांपासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा आणि शिवाजी नगर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत रविवारी (दि.११) सायंकाळी ताब्यात घेतले. या तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे तपासातील अभ्यास आणि चातुर्य कामी आल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. हर्षद तुळशीराम शिंदे (वय ३८) हे नगरपालिकेत कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. मंगळवारी दुपारी अंकुश नगर परिसरात पाईपलाईनचे काम सुरू असताना आरोपी विशाल उर्फ बप्या सूर्यवंशी याने त्यांच्यावर हल्ला केला. आरोपीने सुरुवातीला हर्षद शिंदे यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या, मात्र त्या हर्षदला लागल्या नाहीत. आपला जीव वाचवण्यासाठी हर्षद तिथून पळू लागले असता, आरोपीने त्यांचा

» पान २ वर





राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ जयंती निमित्त अभिवादन करताना ॲड.राहुल वाईकर, राजेंद्र कदम.

# पात्रूड-आनंदगाव-मोगरा रस्त्यासाठी ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

## कंत्राटदाराच्या चौकशीच्या मागणीचे कलेक्टर यांना दिले निवेदन

**पात्रूड । किसान न्युज**

माजलगाव तालुक्यातील पात्रूड येथून आनंदगाव-मोगरा या रस्त्याची दुरवस्था झाली असून, याची दुरुस्ती करण्यात यावी तसेच रस्ता दुरुस्तीसाठी दोनवेळा निधी येऊन ही काम न करता बिल उचलण्यात आल्याचा आरोप करीत या प्रकरणाची चौकशी करुन २६ जानेवारीच्या आत रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी कलेक्टर यांना निवेदन देऊन दिला आहे. या निवेदनावर शेकडो ग्रामस्थ, शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पात्रूड-आनंदगाव-मोगरा सदरील रस्ता हा पूर्वी पानंद रस्ता होता. १९९६-९७ मध्ये सदरील रस्ता रोहयो मधून खोदकाम करुन पानंद भरण्यात आले. पुढे चालून या रस्त्यावर मोठ्याप्रमाणात रहदारी वाढल्यामुळे

» पान २ वर

# शुजा फुटबॉल क्लब च्या शेख अमान यांची विद्यापीठ संघात निवड



**बीड । किसान न्युज**

बीड येथील शुजा फुटबॉल क्लब चा खेळाडू शेख अमान याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ फुटबॉल संघात निवड करण्यात आली असून महिन्यात १ जानेवारी ते १२जानेवारी दरम्यान गुजरात येथील बडोदा येथे झालेल्या ए आय यू वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले या कामगिरी बद्दल फूटबॉल कोच शंकर धांडे, शेख अफरोज सर, शेख आफताब, शेख एजास आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे

# बंद पडलेली जिल्हापरिषद शाळा माजी विद्यार्थी सुरू करणार

## ६०० विद्यार्थ्यांनी केला गतवैभव मिळवून देण्याचा संकल्प




### केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन, कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांना घडवणारी शाळा धूळखात पडून

**केज । किसान न्युज**

तालुक्यातील एकमेव नावाजलेली जिल्हापरिषद माध्यमिक शाळा, केज पटसंख्ये अभावी बंद पडली आहे. भव्य इमारतीच्या अनेक वर्गाची पडझड झालेली आहे विदयार्थी नसल्याने अनेक शिक्षकांच्या बदल्या इतर शाळेवर करण्यात आल्या आहेत. ही शाळा आता धूळखात पडलेली असल्याने पुन्हा ही शाळा सुरू करुन गतवैभव प्राप्त करुन देण्याचा संकल्प माजी विद्यार्थ्यांनी केला. यासाठी तब्बल ६०० विद्यार्थी एकत्र आले आहेत. यासाठी माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न सुरू केले असून पुढील दोन वर्षांत ही शाळा पुन्हा पूर्वीप्रमाणे नावाजलेली असेल असा विश्वास व्यक्त केला. केज शहरात २३ खाजगी शाळा आहेत. यात अनेक इंग्लिश, मराठी, उर्दू शाळा असल्यामुळे जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थी खाजगी शाळेत व इंग्लिश स्कूल मध्ये जात होती. खाजगी शाळा चालविणारे विद्यार्थ्यांना अनेक प्रलोभने दाखवून या शाळेतील विद्यार्थी घेऊन गेले त्यामुळे शाळेतील विद्यार्थी संख्या घटली परिणामी

» पान २ वर

# अपात्र लाडक्या बहिणींना पुन्हा ई केवायसीची संधी द्या : जे.डी.शाह

**बीड । किसान न्युज**

जिल्ह्यातील लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी किंवा नजरचुकी मुळे अपात्र ठरलेल्या तसेच अद्याप ई-केवायसी प्रलंबित असलेल्या महिलांना पुन्हा एकदा ई-केवायसी करण्याची संधी द्यावी. तसेच ज्या पात्र लाडक्या बहिणींचे आर्थिक सहाय्य थांबले आहे, ते पुन्हा सुरू करण्यात यावे, अशी समाजसेवक मागणी जे.डी.शाह यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा तसेच पालकमंत्री तथा पालकमंत्री अर्थमंत्री अजित पवार आणि महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केले आहे की, गेवराईसह बीड जिल्ह्यातील तसेच संपूर्ण राज्यातील अनेक लाभार्थी महिलांकडून लाडकी बहीण योजनेसंदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारीनुसार, ई-केवायसी प्रक्रिया करताना




काही घरामध्ये शासकीय कर्मचारी आहे हा पर्याय निवडला गेला आहे. परिणामी संबंधित महिलांना ई- केवायसी शासकीय कर्मचारी असा नकार संदेश प्राप्त होत असून त्या महिलांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. वास्तविक पाहता, संबंधित महिलांच्या कुटुंबामध्ये कोणताही शासकीय कर्मचारी नसताना केवळ तांत्रिक चूक, माहितीअभावी किंवा अज्ञानामुळे झालेल्या चुकीच्या निवडीमुळे त्या महिला अपात्र ठरत आहेत. याशिवाय, काही महिलांची ई-केवायसी प्रक्रिया

» पान २ वर

# राजेंद्र काशिद यांना पितृ शोक

**बीड । किसान न्युज**

आज दिनांक १२ जानेवारी २०२६



सोमवार रोजी दै. रिपोर्टरचे जाहिरात व्यवस्थापक राजेंद्र काशिद यांचे वडील बबनराव काशिद (वय ९६ वर्ष ) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम, मोंढा रोड येथे दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. स्व. बबनराव काशिद यांच्या पश्चात भाऊ, बहिण, मुले, मुलगी, जावाई, नातवंडे, पतरुंडे असा मोठा परिवार आहे. काशिद परिवाराच्या दुःखात दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

CMYK